# संवेदनशील तंत्रज्ञानाने मानवी विकास शक्य

## अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी : शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञानाने जशी भौतिक प्रगती झाली तसेच असंवेदशीलताही वाढीस लागली आहे. संवेदनशील तंत्रज्ञानच विश्वाचा व अखिल मानव जातीचा विकास करू शकते, असे मत अदृश्य काडसिद्धश्वर स्वामीजी यांनी व्यक्त केले. कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते.

'तंत्रज्ञान युगातील सामाजिक भान' या विषयावर झालेल्या या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पांडुरंग शेवाळे हे उपस्थित होते. संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अमर टिकोळे यांनी नियोजन केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी काडसिद्धेश्वर स्वामींनी आपल्या भाषणात पुरातन भारतीय तंत्रज्ञानाची व त्याच्या समाजासाठी केलेला सदुपयोगाची उदाहरणासहित माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी शिवाजीराव देसाई यांच्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी शशीताई देसाई, भरत पाटील, उपाध्यक्ष सुनील कुलकर्णी, सचिव दीपक चौगुले आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : केआयटीच्या वतीने १६ व्या शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत बोलताना अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी. डावीकडून डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी आदी.




कोल्हापूर : शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत बोलताना काडसिद्धेश्वर स्वामी. सोबत डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, डॉ. पांडुरंग शेवाळे, भरत पाटील, शशीताई देसाई.

# भौतिक प्रगतीमुळे असंवेदनशीलता वाढीस

## काडसिद्धेश्वर स्वामी; शिवाजीराव देसाई व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आधुनिक तंत्रज्ञानाने भौतिक प्रगती झाली आहे. त्याचबरोबर असंवेदशीलता वाढीस लागली आहे. संवेदनशील तंत्रज्ञान विश्वाचा व अखिल मानव जातीचा विकास करू शकते, असे प्रतिपादन काडसिद्धेश्वर स्वामी यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेत 'तंत्रज्ञान युगातील सामाजिक भान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. पांडुरंग शेवाळे होते. संस्थेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी शिवाजीराव देसाई यांच्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अमर टिकोळे यांनी नियोजन केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शशीताई देसाई, सुनील कुलकर्णी, सचिव दीपक चौगुले उपस्थित होते.

# विविध ७८ कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ


## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या ७८ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने शुक्रवारी घेतला. त्यासह नव्या आर्थिक वर्षातील ताळेबंद हा अधिसभेसमोर सादर करण्याच्या विषयाला मंजुरी देण्यात आली.

विद्यापीठात व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. विद्यापीठामध्ये सध्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या अधिविभागांमध्ये सध्या ८४ नियमित प्राध्यापक, तर ७८ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक कार्यरत आहेत. यातील कंत्राटी प्राध्यापकांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मुदतवाढ दिली होती. या प्राध्यापकांची मुदत सोमवार (दि.७) संपणार होती. त्यामुळे पुनर्नियुक्तीबाबत कोणता निर्णय होणार याकडे त्यांचे लक्ष लागले होते. व्यवस्थापन परिषदेने या कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यासह पुढील कालावधीसाठी प्राध्यापकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया येत्या १५ दिवसांत सुरू करण्याची सूचना विद्यापीठ प्रशासनाला दिली. विद्यापीठाचे अंदाजपत्रक हे दि. ३० डिसेंबरला अधिसभेसमोर सादर होणार आहे. हे अंदाजपत्रक, ताळेबंद सादर करण्यास मंजुरी दिली. अंदाजपत्रक आणि तरतुदींबाबत चर्चा करण्यात आली.

# कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ



कोल्हापूर, त. ४ : शिवाजी विद्यापीठातील ७८ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय झाला. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत याला मान्यता मिळाली. तसेच पुढील पंधरा दिवसांत प्राध्यापक भरती संदर्भात कार्यवाही करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

विद्यापीठात ८४ नियमित प्राध्यापक कार्यरत आहेत. तर ७८ सहाय्यक प्राध्यापक कंत्राटी पद्धतीवर काम करतात. या प्राध्यापकांचा करार मार्च महिन्यामध्ये संपला होता. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी या प्राध्यापकांना मुदतवाढ दिली होती.

सोमवारी (ता. ७) त्यांचा मुदतवाढीचा करारही संपणार होता. त्यामुळे आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे मध्ये चर्चा झाली. या बैठकीला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिष्ठाता उपस्थित होते.